# ‘दूरशिक्षण’च्या २२ पासून प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण विभागाच्या वतीने एम.बी.ए. आणि एम.ए. विद्याशाखा बदल यासाठी पुनश्च प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. २२ नोव्हेंबरपासून प्रवेश परीक्षा सुरू होणार आहेत.



इच्छुक विद्यार्थ्यांनी online.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज करावयाचे असून १५ नोव्हेंबर अर्जाची अंतिम तारीख आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने प्रवेश शुल्क भरता येणार आहे. दि. २२ रोजी एम.बी.ए. व एम.ए. विद्या शाखेची दि. २३ नोव्हेंबर रोजी प्रवेश परीक्षा होणार आहे. शंभर गुणांचे बहुपर्यायी प्रश्न परीक्षेत असणार आहेत. प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम व अधिक माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.